DISTRICT MAGISTRATE OSMANABAD

# जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद

(उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्रमांक 02472-227301

फॅक्स क्रमांक 02472-228018

Email ID- rdc1osmanabad@gmail.com

---

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.

3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51.

4. भारत सरकार, गृह मंत्रालय यांचे आदेश क्र. 40-3/2020-DM-I(A) दि. 30 मे 2020.

5. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 31 मे 2020.

6. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 31.05.2020.

7. मा. सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई-32 यांचे पत्र क्रमांक डी एम यु-2020/प्र.क्र.92/आ.व्य.प्र.-1 दि. 22 जून 2020.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26

दिनांकः- 23/06/2020.

**विषय:- मंगल कार्यालयामध्ये लग्नसमारंभ साजरा करण्यास परवानगी देणेबाबत.**

**आदेश:-**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र. 5 अन्वये महाराष्ट्र शासनाने लॉकडाऊनचा कालावधी दि. 30 जून 2020 पर्यंत वाढविला असून लॉकडाऊनचे कालावधीत करावयाच्या कार्यवाहीबाबत मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार या कार्यालयाने संदर्भ क्र. 6 अन्वये आदेश पारित केला आहे. ज्याअर्थी संदर्भ क्र. 7 अन्वये मा. सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई-32 यांनी आता पावसाळा सुरु झाला असल्यामुळे, खुले लॉन, विना वातानुकूलित मंगल कार्यालय/हॉल/सभागृह, घर व घराच्या परिसरात 50 लोकांच्या मर्यादेत सोशल डिस्टंसिंग तसेच कोविड-19 संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांचे पालन



Scanned by CamScanner

करण्याच्या अटीवर लग्न समारंभ पार पाडण्यास, नागरिकांकडून मागणी प्राप्त झाल्यास परवानगी देण्यात यावी असे कळविले आहे.

त्याअर्थी मी दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हाधिकारी, उस्मानाबाद उपरोक्त वाचा क्र. 2 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांनुसार **खुले लॉन, विना वातानुकूलित मंगल कार्यालय/हॉल/सभागृह, घर व घराच्या परिसरात 50 लोकांच्या मर्यादेत सोशल डिस्टंसिंग तसेच कोविड-19 संदर्भात वेळोवेळी शासनाने व या कार्यालयाने निर्गमित केलेल्या सूचनांचे पालन करण्याच्या अटीवर लग्न समारंभ पार पाडण्यास, नागरिकांकडून मागणी प्राप्त झाल्यास परवानगी देणेबाबत INCIDENT COMMANDER तथा तालुका दंडाधिकारी सर्व जि. उस्मानाबाद यांना आदेशित करीत आहे.**

(दिपा मुधोळ-मुंडे)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

**प्रत:-** 1. मा. सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई-32.
2. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
3. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन विभाग, मंत्रालय, मुंबई-32.

**प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, उस्मानाबाद.
4. जिल्हा आरोग्य अधिकारी, उस्मानाबाद.
5. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
6. उपविभागीय अधिकारी तथा INCIDENT COMMANDER सर्व जिल्हा उस्मानाबाद.
7. तहसिलदार तथा INCIDENT COMMANDER सर्व जिल्हा उस्मानाबाद.
8. गट विकास अधिकारी, पंचायत समिती सर्व जिल्हा उस्मानाबाद.
9. मुख्याधिकारी न.प./न.पं. सर्व जिल्हा उस्मानाबाद.
10. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

27/5/20
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**
DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD



Scanned by CamScanner